सकाळ

9 May 2011 Page. 3

# 'जारो एज्युकेशन'ची रोजगार केंद्राशी भागीदारी

**चुनाभट्टी (बातमीदार) :** रोजगार प्रवेश परीक्षेसाठी 'जारो एज्युकेशन'ने 'रूट टू जॉब्स' हा मोफत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कंपनीने या उपक्रमासाठी राज्य सरकारच्या रोजगार आणि स्वयंरोजगार केंद्राशी भागीदारी केली.

याप्रसंगी राज्याच्या रोजगार आणि स्वयंरोजगार केंद्राचे मुंबई उपनगर आणि ठाणे विभागाचे संचालक एन. ओ. भटगुजर, सी. ए. कुबल, अभिनेत्री आदिती गोवित्रीकर आणि मृणाल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

'रूट टू जॉब्स' ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक रोजगार केंद्रात दर महिन्याला एक हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ही ऑनलाइन प्रशिक्षण सुविधा त्यांना मोफत पुरविली जाणार आहे. याबाबत भटगुजर म्हणाले, महाराष्ट्रातील सुमारे ४० रोजगार केंद्रांत नोंदणी केलेल्या हजारो बेरोजगार तरुणांसाठी असे शिक्षण देणाऱ्या संस्थेची आम्ही प्रतीक्षा करीत होतो. 'जारो' ही संस्था बेरोजगारीचे ओझे निश्चितच कमी करेल. विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळालेल्या तरुणांकडून प्रेरणा मिळावी, यासाठी त्यांची यशोगाथा या प्रशिक्षणामध्ये मांडावी, अशी विनंती भटगुजर यांनी कंपनीकडे केली. 'रोजगार केंद्रांत नोंदणी केलेले तरुण अल्प उत्पन्न गटातले आणि प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षण घेतलेले असतात. ते संगणक हाताळण्यात कुशल नसतात. शिवाय त्यांना संवादकौशल्य, साधारण कौशल्य आणि व्यवसाय मार्गदर्शनही मिळत नाही, ही खरी समस्या आहे. यादृष्टीने 'जारो' संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडेल', असा विश्वास कुबल यांनी व्यक्त केला.